


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ९३, मंगळवार ४ मार्च २०२५ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# बाजार समितीत 'किसन' राज!

## ■ सभापतीपदी किसनराव रासकर ■ उपसभापतीपदी शिवसेनेचे किसनराव सुपेकर ■ गंगाराम बेलकर यांची संधी पुन्हा हुकली

पारनेर : प्रतिनिधी

**कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी किसनराव रासकर तर उपसभापतीपदी शिवसेनेचे किसनराव सुपेकर यांची सोमवारी बिनविरोध निवड झाली. जवळे परिसरातील रासकर व सुपेकर यांची या पदावर वर्णी लागल्याने बाजार समितीमध्ये किसनराज आले आहे !**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूकीत महाविकास आघाडी पुरस्कृत खा. नीलेश लंके व विधानसभेचे मा. उपाध्यक्ष विजयराव औटी यांच्या नेतृत्वाखालील पॅनलचे सर्व जागा जिंकत भाजपा पुरस्कृत पॅनलचा धुव्वा उडविला होता. त्यावेळी पदाधिकारी निवडीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून पक्षाचे तालुकाध्यक्ष बाबाजी तरटे यांना सभापतीपदाची संधी देण्यात आली. उपसभापतीपदी नीलेश लंके प्रतिष्ठानचे तालुकाध्यक्ष बापूसाहेब शिर्के यांची वर्णी लावण्यात आली. दोघांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या पदांची निवड करण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक विकास जाधव यांनी सोमवारी संचालक मंडळाची विशेष सभा बोलविली होती. या सभेत दोन्ही पदाधिकाऱ्यांची निवड बिनविरोध करण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा अध्यासी अधिकारी विकास जाधव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या संचालक मंडळाच्या बैठकीस मावळते सभापती बाबाजी तरटे, मावळते उपसभापती बापूसाहेब शिर्के, ज्येष्ठ संचालक गंगाराम बेलकर, अशोक कटारिया, डॉ. आबासाहेब खोडदे, रामदास भोसले, संदीप सालके, डॉ. पद्मजा पठारे, किसनराव रासकर, किसनराव सुपेकर, मेघा रोकडे, बाबासाहेब नऱ्हे, विजय पवार, चंदन भळगट, तुकाराम चव्हाण हे १८ पैकी १५ संचालक उपस्थित होते. सहाय्यक निबंधक कार्यालयातील मुख्य लिपिक आर.एस.चाबुकस्वार, आर.पी.आगरकर तसेच बाजार समितीचे सचिव सुरेश आढाव यांनी अध्यासी अधिकारी विकास जाधव यांना सहाय्य केले.



■ कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी किसनराव रासकर तर उपसभापतीपदी किसनराव सुपेकर यांची बिनविरोध निवड झाल्यानंतर खा. नीलेश लंके यांच्या संपर्क कार्यालयात उभायतांचा सत्कार करण्यात आला. (छाया : किरण शिंदे)

### सावंत, गायकवाड, नगरे यांची दांडी !

राष्ट्रवादी काँग्रेसचे विभाजन झाल्यानंतर अजित पवार यांच्यासोबत गेलेले अशोक सावंत, प्रशांत गायकवाड तसेच शिवसेनेचे शंकर नगरे हे तिघे संचालक पदाधिकारी निवडीसाठी बोलविण्यात आलेल्या विशेष बैठकीकडे फिरकलेही नाहीत. त्यांनी बैठकीला दांडी मारल्यानंतर त्याची चर्चा बाजार समितीच्या वर्तुळात सुरू होती. दरम्यान, पदाधिकारी निवडीमध्ये आम्ही हस्तक्षेप करणार नसल्याचे मा. सभापती प्रशांत गायकवाड यांनी यापूर्वीच स्पष्ट केले होते.

### निष्ठावान शिवसैनिकाला संधी

स्व. बाळासाहेब ठाकरे यांचे निष्ठावान शिवसैनिक म्हणून ओळख असलेल्या किसनराव सुपेकर यांनी पंधरा वर्षे विविध कार्यकारी सेवा संस्थेचे चेअरमनपद भुषविलेले आहे. सन २००४ मध्ये ते बाजार समितीचे संचालकही होते. लोकसभा निवडणूकीच्या निमित्ताने नगर येथील यश पॅलेसमध्ये खा. नीलेश लंके यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत खा. लंके यांनी किसनराव सुपेकर यांना आपण बाजार समितीमध्ये सभापतीपद किंवा उपसभापतीपद देणार असल्याचे जाहिर केले होते. किसनराव यांनी पदाची अपेक्षाही ठेवलेली नसताना त्यांच्या निष्ठेला न्याय देण्याची माझी जबाबदारी असल्याचे खा. लंके यांनी त्यावेळी सांगितले होते. त्यावेळी दिलेला शब्द पाळून खा. लंके यांनी शब्द पाळल्याने शिवसैनिकांनी आनंद व्यक्त केला.

### बेलकर यांची संधी हुकली

बाजार समितीमधील ज्येष्ठ सदस्य म्हणून मा. सभापती गंगाराम बेलकर यांना संधी मिळेल अशीच चर्चा सोमवारी सकाळपर्यंत होती. गेल्या वेळी पदाधिकारी निवडीवेळीही बेलकर यांना सभापतीपदाने हुलकावणी दिली होती. लवकरच होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणूकीमध्ये जिल्हा परिषदेच्या टाकळीढोकेश्वर गटातून बेलकर यांना रिंगणात उतरविण्यात येणार असल्याची माहीती आहे.

### निष्ठेला न्याय

पाच वर्षे पंचायत समितीचे सदस्य म्हणून काम पाहिलेले किसनराव रासकर हे सन १९८० पासून राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांचे निष्ठावान कार्यकर्ते आहेत. अलिकडेच पार पडलेल्या लोकसभा व विधानसभा निवडणूकीत रासकर यांनी खा. नीलेश लंके व राणी लंके यांच्या प्रचाराची धुरा प्रामाणिकपणे सांभाळली होती. समता परिषदेचे तालुकाध्यक्ष असलेले किसनराव हे राष्ट्रवादी काँग्रेसच्या ओबीसी सेलचेही पदाधिकारी आहेत. जवळा ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच तसेच सेवा संस्थेचे चेअरमन म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे. खासदार नीलेश लंके यांनी किसनराव यांच्या निष्ठेला न्याय देत उतरत्या वयात सभपतीसारख्या मोठया पदावर काम करण्याची संधी त्यांना दिली आहे.

### मावळते सभापती, उपसभापती सुचक अनुमोदक

मावळते सभापती बाबाजी तरटे यांनी सभापतीपदासाठी अर्ज दाखल केलेल्या किसनराव रासकर यांच्या अर्जावर सुचक म्हणून स्वाक्षरी केली तर मावळते उपसभापती बापूसाहेब शिर्के यांनी अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली.

### उपसभापतींना कटारिया, बेलकर सुचक, अनुमोदक

उपसभापतीपदासाठी अर्ज दाखल केलेल्या किसनराव रासकर यांच्या अर्जावर मा. सभापती अशोकलाल कटारिया यांनी सुचक म्हणून तर मा. सभापती गंगाराम बेलकर यांनी अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली.

### शेतकरी पदावर बसल्याने आनंद

सभापती किसनराव रासकर व उपसभापती किसनराव सुपेकर हे दोघेही आजही शेतामध्ये जाऊन वेगवेगळी कामे करतात. हाडाचे शेतकरी म्हणून त्यांची ओळख आहे. शेतकऱ्यांची कामधेनू म्हणून असलेल्या बाजार समितीच्या पदांवर शेतकऱ्यांना संधी मिळाल्याने तालुक्यात आनंद व्यक्त करण्यात येत आहे.

# सुपा चौकात अज्ञात वाहनाने दोघांना चिरडले

## एकजण गंभीर जखमी ■ दुचाकीला ठोकरून अज्ञात वाहन पसार ■ घटना सीसीटीव्हीमध्ये कैद






सुपा : प्रतिनिधी

**नगर-पुणे महामार्गावर सुपा चौकात अज्ञात वाहनाने दुचाकीस ठोकर देत दुचाकीवरील दोघांना जागीच चिरडले. या अपघातात एक जण गंभीर जखमी झाला. दुचाकीस ठोकर देऊन अज्ञात वाहन घटनास्थळावरून पसार झाले. रविवारी पहाटे २ वाजून ३६ मिनिटांनी ही घटना घडली असून संपूर्ण घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे.**

रविवारी पहाटे रावसाहेब लक्ष्मण कडूस वय ८०, साहेबराव रखमाजी कडूस वय ६४ दोघेही रा. सारोळा कासार, ता. नगर व संजय बाबूराव खोसे रा. अस्तगांव ता. पारनेर हे दुचाकीवरून सुपा चौकातून वाळवणे रस्त्याकडे जाण्यासाठी नगर-पुणे महामार्ग ओलांडत असताना नगरकडून पुण्याकडे भरधाव वेगाने जाणाऱ्या अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीस जोराची ठोकर दिली. त्यात रावसाहेब कडूस व साहेबराव कडूस हे चिरडले जाऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला तर संजय खोसे हे गंभीर जखमी झाले. त्यांना पुणे येथील कमांड हॉस्पिटलला पुढील उपचारासाठी हलविण्यात आले. तर कडूस द्वयांचे मृतदेह पारनेर येथील ग्रामीण रूग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले.

शवविच्छेदनानंतर दोघांवर सारोळा कासार येथील स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मयत रावसाहेब कडूस यांच्या पश्चात पत्नी ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे तर साहेबराव कडूस यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सुपा पोलीस ठाण्यात या घटनेसंदर्भात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मोनिका जोजाट या करत आहेत.

### अज्ञात वाहनाचा शोध सुरू

दुचाकीस ठोकर दिल्यानंतर झालेल्या दुर्घटनेनंतर ठोकर देणाऱ्या वाहनाने घटनास्थळी थांबून जखमींना मदत करणे अपेक्षीत असताना वाहनचालक वाहनासह पसार झाला आहे. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली असून या फुटेजच्या अधारे अज्ञात वाहनाचा शोध सुपे पोलीसांनी सुरू केला आहे.

### पिंपळनेर यात्रेवरून परतताना काळाचा घाला

मयत व जखमी हे शनिवार दि.१ मार्च रोजी सायंकाळी पिंपळनेर येथील संत निळोबाराय महाराजांच्या यात्रोत्सवासाठी दुचाकीवरून गेले होते. यात्रोत्सवातील विविध धार्मिक कार्यक्रमांना हजेरी लाऊन तिघेही २ मार्च रोजी पहाटे २ च्या सुमारास घरी जाण्यासाठी पिंपळनेहून निघाले. त्यांची दुचाकी सुपा चौकात पोहचल्यानंतर रस्ता ओलांडताना भरधाव वाहनाने त्यांना चिरडले.

# लाडकी बहीण योजनेचा फेब्रुवारीचा हप्ता मार्चमध्ये !

## | गत महिन्याचा हप्ता महिला दिनाच्या पूर्वसंध्येला मिळणार | मंत्री अदिती तटकरेंची माहिती

मुंबई : प्रतिनिधी

**लाडक्या बहिणींना फेब्रुवारी महिन्याचा हप्ता हा महिला दिनाच्या पूर्वसंध्येला देण्यात येणार, अशी माहिती मंत्री अदिती तटकरे यांनी दिली आहे. तर महिला प्रतिनिधीसाठी विशेष सत्र होणार असल्याची माहिती आहे.**



अदिती तटकरे पुढे बोलताना म्हणाल्या की, लाडकी बहीण योजनेवर विरोधक आधीपासूनच टीका करत आले आहेत. आम्ही जवळपास अडीच कोटी महिलापर्यंत पोहचू शकलो आहोत, गेल्या महिन्यातदेखील २ कोटी ४० लक्ष महिलांना यांचा लाभ पोहचला आहे. फेब्रुवारी महिन्यातीलदेखील त्याच प्रमाणात लाभार्थी राहणार आहेत.

महायुतीचे सरकार सक्षम

उर्वरीत पान ३ वर

# शेजाऱ्याने फ्लॅट फोडून वीस हजार रूपये चोरले !

## सुपा पोलीस ठाण्यात परप्रांतीयाविरोधात गुन्हा

सुपा : प्रतिनिधी



**शेजारच्या फ्लॅटमध्ये राहणाऱ्या परप्रांतीयाने महिलेच्या फ्लॅटचे कुलूप तोडून फ्लॅटमध्ये ठेवण्यात आलेले वीस हजार रूपये चोरून नेल्याची घटना सुपे येथे घडली आहे. याप्रकरणी सुपा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सहा. पोलीस निरीक्षक सोमनाथ दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक मासाळकर हे पुढील तपास करत आहेत.**

यासंदर्भात कांता कैलास मिसाळ यांनी फिर्याद दाखल केली आहे. कांता मिसाळ व त्यांची मुलगी फ्लॅटला कुलूप लाउन कामासाठी गेल्या असता त्यांचा शेजारी मंगलसिंह रामस्वरूप कुशावाहन रा. गायपांदोरी, ता. मोठ, जिल्हा झाशी उत्तरप्रदेश हल्ली रा. सुपा याने मिसाळ यांच्या बंद फ्लॅटचे कुलूप तोडून किचनमधील पोटमाळयावर ठेवण्यात आलेल्या प्लॅस्टिकच्या डब्यातील वीस हजार रूपयांची रोकडे चोरून तो पसार झाला. सुपा पोलीस पुढील तपास करत आहेत.

# अधिवेशनाच्या सुरुवातीलाच गदारोळ !

## कोकाटेंबाबतच्या भूमिकेवरून अंबादास दानवे व सत्ताधारी भिडले

मुंबई : प्रतिनिधी

**बनावट दस्तावेजाच्या आधारे अल्प उत्पन्न गटातून शासकीय कोट्यातील सदनिका लाटून महाराष्ट्र सरकारची फसवणूक केल्याप्रकरणी न्यायालयाने राज्याचे कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे आणि त्यांचे बंधू विजय कोकाटे यांना दोन वर्षांचा कारावास आणि प्रत्येकी ५० हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा ठोठावली आहे.** याप्रकरणी कोकाटे यांचा राजीनामा घ्यावा अशी मागणी विरोधकांनी लावून धरली आहे. दरम्यान, या प्रकरणावरून आज विधीमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी वरिष्ठ सभागृहात (विधान परिषद) मोठा गोंधळ पाहायला मिळाला.

विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी कोकाटे प्रकरणावर सरकारने भूमिका जाहीर करावी अशी मागणी केली. मात्र विरोधकांनी त्यावर गोंधळ घालण्यास सुरुवात केली. ''आज केवळ शोक प्रस्ताव सादर केला जाणार आहे. यावर कनिष्ठ सभागृहात चर्चा होईल'' असं सत्ताधाऱ्यांचं म्हणणं होतं. अखेर सभापती राम शिंदे यांनी हस्तक्षेप करून हा गोंधळ रोखला.

अंबादास दानवे यांनी शोक प्रस्तावाआधी बोलण्याची परवानी मागितली. त्यांना राम शिंदे यांनी परवानगी दिल्यानंतर दानवे म्हणाले, ''राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर न्यायालयाने कारवाई केली आहे''. तेवढ्यात विरोधकांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. यावर दानवे म्हणाले, ''मी केवळ सरकारकडे खुलासा मागतोय. माझा अधिक आग्रह नाही''. यावर सभापती म्हणाले, ''ते (माणिकराव कोकाटे) विधानसभेचे सदस्य आहेत. त्यामुळे कनिष्ठ सभागृहात यावर चर्चा होईल. तरीदेखील तुम्हाला या विषयावर बोलायचं असेल तर तुम्ही उद्या बोलू शकता''.

# राज्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज

## यंदा महिनाभर आधीच उन्हाचा पारा चढला

नागपूर : प्रतिनिधी

**राज्यातील बहुतांश भागात काल रविवारी ढगाळ वातावरण होते. सायंकाळी आकाशात ढगांची गर्दी झालेली दिसून आली. एकूणच काल पावसाचे वातावरण तयार झाले होते. मात्र, पाऊस आला नाही. फेब्रुवारीच्या पूर्वार्धातच राज्यातील अनेक भागात उन्ह चांगलेच तापले. तर कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसच्याही पुढे गेले.**

एरवी होळीनंतर राज्यात उन्ह तापायला सुरुवात होते आणि तापमान चाळीशी पार जाते. यावेळी महिनाभर आधीच तापमान वाढायला लागले. त्यामुळे नागरिकांच्या चिंतेत भर टाकली. आता पुन्हा एकदा नागरिकांच्या चिंतेत भर टाकणारा अंदाज हवामान खात्याने दिला आहे.

हवामान खात्याच्या माहितीनुसार येत्या २४ तासात राज्यात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामान खात्याने येत्या २४ तासासाठी हा इशारा दिला आहे. राज्यात उकाड्यात प्रचंड वाढ झाली आहे. हवामानाच्या स्थितीत सातत्याने बदल होत आहे. तापमानात



बऱ्याच ठिकाणी घट दिसून येत असली तरीही उकाड्यात मात्र वाढ झाली आहे.

दरम्यान, हवामान खात्याने राज्यात वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. किनारपट्टी क्षेत्रात याचा परिणाम दिसणार असून, त्यानंतर उष्ण, दमट वातावरण राहण्याचा अंदाज आहे. वाऱ्याचा दबाव आणि समुद्रातील तापमानामुळे पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. किनारपट्टी क्षेत्रावर पावसाचे सावट असतानाच विदर्भात सातत्याने उकाडा जाणवत आहे. चंद्रपूर, वर्धा या जिल्ह्यात कमाल तापमानाचा पारा ३८ अंशांपर्यंत पोहोचला आहे. तर रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, सातारा, सांगली या जिल्ह्यात देखील कमाल तापमान ३६ अंश सेल्सिअसकडे पोहोचले आहे.

मुंबई शहर आणि

उर्वरीत पान ३ वर



फॅशन | संसार | सौंदर्य

सखी

# सौंदर्य आणि स्त्रीत्व...



सुंदरता म्हणजे काय, ती नक्की असते काय, याचाही विचार कधीतरी करायलाच हवा...

**सौंदर्य आणि स्त्रीत्व याची काहीतरी वेगळी सांगड घालण्यात आली आहे. मुलीने सुंदर दिसायला हवे, असा आग्रह होत चालला आहे. हा आग्रह आपल्यावर विविध माध्यमांतून होत असतो. त्यामुळे पौगंडावस्थेतील आणि तारुण्यातील अनेक मुली मानसिक ताणाला बळी पडतात.**

1 मुद्दे दोन आहेत. पहिला आहे सुंदर दिसणे म्हणजे काय? हा अतिशय खोल विषय आहे आणि अतिप्रचंड वादाचा. कोणत्याही दोषाविना असलेली गोष्ट ती सुंदर, असे काहीसे आजकाल झाले आहे. छोटं उदाहरण द्यायचे झाल्यास गोरा रंग, बिन डागाचा चेहरा, काळे घनदाट लांबसडक केस, शरीराची योग्य मोजमापे, हास्य अधिक सुंदर वाटावे म्हणून अगदी सरळ आणि नीटनेटके दात, निमुळती जिवणी आणि अशा असंख्य गोष्टी म्हणजे स्त्री सौंदर्याचे मापदंड. यातील काही कमी-अधिक असल्यास ते ठीक करण्यासाठी नानांविध उपचार, अगदी शस्त्रक्रियेपर्यंत!



2 दुसरा मुद्दा आहे, आपल्या दिसण्यातील दोष घालविण्यासाठी आपण किती आणि काय काय करणार आहोत, हा प्रश्न बायकांना पडत असेल का? गंमत म्हणजे लहान असताना स्वतःला सुंदर समजणाऱ्या मुली, वय वाढते तशा सुंदर दिसण्यासाठी बऱ्याच गोष्टी करायला लागतात. वय वाढते तसे स्वतःची काळजी घेणे वाईट आहे का? प्रेझेंटेबल दिसावे म्हणून काही गोष्टी केल्यास काय चूक आहे? असे मुद्दे यावर येऊ शकतात. मला असे वाटते, की पुरुष मेकअप करतात का? पडद्यावर काम करणारे नट सोडून द्या; कारण ती त्यांच्या कामाची गरज असते. कदाचित कामाव्यतिरीक्त बाहेरच्या जगात वावरताना त्यांना थोडाफार मेकअप करावा लागत असेलही; पण अगदी कॉर्पोरेट सेक्टर, पत्रकारिता (छोटा पडदा सोडून), शिक्षण क्षेत्र इत्यादी ठिकाणी काम करणारे पुरुष मेकअप करतात का? आणि तरीही ते चालते कसे? असे काय आहे बाईच्या शरीरात, की तिच्या सुंदर दिसण्याचे मापदंड म्हणजे डाग विरहित त्वचा, उजळ रंग, गुलाबी ओठ, कोरलेल्या भुवया आणि अशा नऊ हजार नऊशे नव्याणव गोष्टी! सुंदर दिसण्याचा ताण घेऊन कित्येक स्त्रिया जगत असतात आणि ते फार दुर्दैवी आहे.

## मेकअपचा अट्टहास...

निरोगी, स्वस्थ राहणे, व्यायाम करणे, संतुलित आहार घेणे, त्वचेची, आरोग्याची, स्वतःची काळजी घेणे या प्राथमिक गोष्टी आहे. या स्त्री आणि पुरुष अशा दोघांसाठीही आहेत. मीडिया, फिल्म आणि टेलिव्हिजन इंडस्ट्रीने आपल्या डोक्यात हे दिसणे, प्रेझेंटेबल असणे याविषयी भ्रामक कल्पना घालून दिल्या आहेत. अगदी आपल्या येथील तरुणींना विचारल्यास, मेकअप शिवाय घराबाहेर पडणे अशक्य वाटते, असे कित्येक जणी म्हणाल्या. मेकअप आमचा आत्मविश्वास वाढवतो, मग त्यात काय वाईट आहे, असेही सुनावतील. म्हणजे मेकअप करणाऱ्या स्त्रिया चूक आहेत असे नाही. असते आवड काहींना; पण त्यावर एवढे अवलंबून राहणे आणि आपण कसे दिसतो हे पूर्णपणे झाकून, आपण जसे आहोत तसे रोजच्या आयुष्यात राहणे अवघड होत असेल, तर विचार करायलाच हवा.

## हो आहे मी सुंदर...

तर बहिणींनो, मैत्रिणींनो आज दिवसभरात एकदा आरशासमोर चेहरा फक्त स्वच्छ धुवून उभ्या राहा. स्वतःला सांगा, की मी सुंदर आहे आणि बघा कसे वाटते ते! काही सेकंद का होईना, चांगले वाटले, तर ही गोष्ट कायमसाठी लक्षात ठेवा. कोणतीच बाह्य गोष्ट तुम्हाला सुंदर करू शकत नाही. स्वतःच्या शरीराची, मनाची, स्वास्थ्याची काळजी घ्या. व्यायाम करा, पौष्टिक अन्न खा. आपल्या माणसांवर प्रेम करा, स्वतःसाठी थोडा वेळ काढा, ज्या गोष्टी तुम्हाला आतून आनंद देतात त्या करा. मग अगदी पाच वर्षांच्या मुलीसारखे, हो आहे मी सुंदर, असे चटकन ओठावर येते की नाही, ते बघा.

# उन्हाळ्यात परिधान करा ५ फॅब्रिकचे कपडे

**वाढते तापमान आणि उन्हाचा तडाखा यातून थोडा आराम देणाऱ्या कपड्यांची निवड करणे गरजेचे असते. अशाच ५ फॅब्रिकबाबत आपण माहिती जाणून घेणार आहोत. जे यंदाच्या उन्हाळ्यात समरमध्ये तुम्हाला थोडा आराम देतील. महत्त्वाचं म्हणजे या फॅब्रिकमधून नैसर्गिक फिल मिळतो.**



## सेंद्रिय कापूस

कापूस हे कदाचित जगातील सर्वात अष्टपैलू आणि लोकप्रिय फॅब्रिक आहे आणि त्याचे कारण म्हणजे त्यामधून मिळणारा आरामदायी फिल. उष्णतेचा सामना करण्यासाठी कपड्यांकडे देखील विशेष लक्ष द्यायला हवं. सुती कपडे बनवताना अनेक प्रकारे पर्यावरणाची हानी होते. यामुळे अलिकडच्या काही वर्षांत फॅशन उद्योग पर्यावरणाच्या दृष्टीने अधिक जागरूक झाला आहे आणि पारंपरिक कापसाऐवजी सेंद्रीय कापसाकडे वळला आहे. पारंपरिक कापसाच्या तुलनेत सेंद्रिय कापूस तयार करताना ९० टक्के कमी पाणी वापरले जाते, तर कार्बन उत्सर्जनदेखील ४६ टक्क्यांनी कमी होते हे अनेक संशोधनांमध्ये सिद्ध झाले आहे. यात रासायनिक पदार्थ आणि कीटकनाशकांचा वापर नगण्य आहे. त्यामुळे माती आणि स्थानिक जलस्त्रोतांचेही संरक्षण होते. याशिवाय सेंद्रिय कापूस वजनाने हलका आणि श्वास घेण्यायोग्य आहे, जो तुम्ही पारंपरिक कापसाप्रमाणे वापरू शकता. त्यामुळे सेंद्रिय कापसापासून तयार झालेले कपडे उन्हाळ्यात अतिशय फायदेशीर असतात.

## लिनेन

वाढत्या तापमानापासून स्वतःच आणि आपल्या शरीराचं बचाव करण्यासाठी कॉटनपाठोपाठ लिनेन हे फॅब्रिक अतिशय उत्तम आहे. लिनेन हे अतिशय सैल असं तयार केलेलं फॅब्रिक आहे. हे फॅब्रिक अतिशय मोकळं ढाकळं आहे. उन्हाळ्यात येणारा घाम लिनेनमध्ये शोषला जातो. महत्त्वाचं म्हणजे लिनेनच्या उत्तम डिझाइन आणि योग्य रंग याचा मेळ खूप छान इम्पॅक्ट करतं. पार्टी वेअर असो वा फॉर्मल किंवा कॅज्युअल तुम्ही कधीही वापरू शकता.

## चाम्ब्रे

चाम्ब्रे हे एक पातळ आणि हलकं फॅब्रिक आहे. हे फॅब्रिक डेनिमसारखं आहे. चाम्ब्रे हे एक पातळ आणि हलके फॅब्रिक आहे जे डेनिमसारखे दिसते. हे साधे विणलेल्या कापड कापसापासून बनवले जाते. ते तयार करण्यासाठी, थ्रेड्स एकमेकांशी गुंफलेले असतात, जे क्रिस-क्रॉस स्ट्रक्चर बनवतात. पायघोळ, शर्ट, जॅकेट, टॉप, शॉर्ट्स आणि अनेक प्रकारचे पोशाख चाम्ब्रेपासून तयार केले जातात. कडक उन्हाळ्यात डेनिम प्रेमींसाठी एक योग्य पर्याय. कॉटन जर्सी चाम्ब्रेसोबत असेच एक फॅब्रिक आहे, जे उन्हाळ्यात ट्राउझर्ससाठी उत्तम पर्याय आहे.

## खादी

खादी हे भारताच्या भावनांशी निगडित कापड आहे. स्वदेशी चळवळीत या फॅब्रिकला खूप लोकप्रियता मिळाली आणि तेव्हापासून ते लोकांच्या पसंतीस उतरले आहे. खादीचे कापड हाताने विणून तयार केले जाते आणि याच गुणवत्तेमुळे ते इतर कापडांपेक्षा वेगळे बनते. खादी एकतर कापसाच्या तंतूपासून किंवा रेशीमपासून बनविली जाते. पारंपरिकपणे, खादी सांस्कृतिक पोशाख म्हणून लोकप्रिय आहे. पण बदलत्या काळानुसार, अलीकडच्या काही वर्षांत अनेक ब्रँड्सनी इंडो-वेस्टर्न फ्युजन तयार करण्यासाठी त्याचे प्रयोग केले आहेत. आजच्या काळात, फॅशन इंडस्ट्री कोणत्याही प्रश्नाशिवाय खादीची क्षमता स्वीकारत आहे आणि लोक त्याचा अवलंबही करत आहेत.

## सिल्क

रेशीम हे सर्वात मौल्यवान कापडांपैकी एक आहे. रेशीम त्याच्या सुंदरतेसाठी आणि आरामासाठी लोकप्रिय आहे. इतिहासात फक्त राजे आणि राजपुत्रांमध्येच रेशमी पोशाख वापरले गेले आहेत. रेशीम उन्हाळ्यात थंडावा आणते. त्यामुळे वाढत्या तापमानासोबत त्याची मागणीही वाढते.काही वर्षांपूर्वीपर्यंत, रेशीम फक्त रेशीम किड्यांपासून मिळत होते, परंतु पर्यावरणप्रेमी आणि शाकाहारी कापडांच्या वाढत्या मागणीमुळे फॅशन उद्योगाला रेशीम मिळविण्याच्या नवीन पद्धतींचा अवलंब करण्यास भाग पाडले. अलिकडच्या काळात, सेंद्रिय रेशीममधील एरीमोथ तयार करण्यासाठी मारले जात नाही, परंतु ते पूर्णपणे तयार केले जाते आणि फुलपाखरू म्हणून उडण्यास परवानगी दिली जाते. त्यानंतर कोकूनमधून रेशीम तयार केले जातात. रेशमाचे हे पर्यावरणपूरक प्रकार अद्याप मुख्य प्रवाहात आलेले नाहीत. परंतु चांगली बातमी अशी आहे की फॅशन उद्योगाने योग्य दिशेने वाटचाल सुरू केली आहे.



# उन्हाळ्यात चिकट केसांनी हैराण?

**वातावरणात उष्णता वाढू लागली आहे आणि त्याचा परिणाम डायरेक्ट होतो तो केसांवर. केस चिकट होऊन त्यात खाज, दुर्गंध या गोष्टी जाणवू लागल्या असतील तर वेळीच तुम्ही केसांची काळजी घ्यायला सुरुवात करा. कारण आज केस धुतले तरीही घामामुळे दुसऱ्या दिवशीपर्यंत केसांची वाट लागणारच. घाम हे केस चिकट होण्याचे मुख्य कारण आहे.**



**उन्हाळ्याच्या दिवसात घामापासून दूर राहणे असं तर शक्य नाही. त्यामुळे केसांची अधिक काळजी घ्यावी लागते. तुम्ही जर आम्ही सांगितलेल्या ५ टिप्सचा वापर केलात तर ही समस्या नियंत्रणात नक्कीच येऊ शकते.**

- केसांसाठी असणाऱ्या सनस्क्रिन : त्वचेसह उन्हाळ्यात केसांनाही सुरक्षा द्यावी लागते. इंटरनॅशनल जर्नल ऑफ कॉस्मेटिक सायन्सनुसार, उन्हामुळे केस खराबच होत नाहीत तर मुळापासून कमकुवतही होतात. तसंच उन्हामुळे कोरडे आणि निस्तेज दिसू लागतात. यासाठी केसांचे सनस्क्रिन वापरावे. सनस्क्रिन हेअर स्प्रेचा वापर करून केसांची काळजी घ्या.
- करा सैलसर हेअरस्टाईल : उन्हाळ्यात केस मोकळे सोडणे कठीण असते. रोज केस मोकळे सोडल्यास, त्यावर धूळ, माती साचून आणि प्रदूषणाने अधिक केस चिकट होतात. यापासून वाचण्यासाठी तुम्ही नियमित सैलसर हेअरस्टाईलची सवय लावा. तुम्हाला केस कोरडे जाणवल्यास, कोरफड जेल लावा आणि मग सुकल्यावर केस धुवा.
- लांब दाताच्या फणीचा वापर : लांब दाताच्या फणीमुळे केसांचा गुंता लवकर सोडविण्यास मदत मिळते आणि केस जास्त गळत नाहीत. याशिवाय तुम्ही चिकट केसांसाठी बांबू कोम्बचा वापर करू शकता. बांबू कोम्बचा वापर केसांवर केल्याने नैसर्गिक तेल येण्यास मदत मिळते, जे तुमच्या स्काल्पला निरोगी बनवते. रक्तप्रवाह वाढवून केसांच्या समस्यांपासून सुटका मिळवून देते.
- केस रोज धुऊ नका : कितीही घाम आला तरीही सतत केस धुतल्यास, नैसर्गिक तेल निघून जाते. आठवड्यातून केवळ ३ वेळा केस धुवा. इतर दिवशी तुम्ही ड्राय शँपू अथवा कोरफड जेलचा वापर करून केसांची काळजी घेऊ शकता.
- हेअर हायड्रेटिंग स्प्रेचा वापर : शँपू आणि कंडिशनिंगनंतर केसांना हायड्रेट करणे गरजेचे आहे. केस ओले असतानाच तुम्ही केसांवर हेअर हायड्रेटिंग स्प्रेचा वापर करावा. हा तयार करण्यासाठी पाणी, कोरफड रस, अवाकाडो तेल मिक्स करा आणि स्प्रे बाटलीत भरून केस धुतल्यावर केसांवर फवारा. त्यानंतर केस सुकवा, म्हणजे चिकट दिसणार नाहीत.

# हातावरील मेहंदीचा रंग गडद करायचा?

**मेहंदी लावणे अत्यंत चांगले मानले जाते. विशेषतः उन्हाळ्यात शरीरातील उष्णता कमी करण्यासाठी याचा उपयोग करून घेता येतो. मेहंदी तुमच्या सौंदर्यात तर भर घालतेच. पण आता येणाऱ्या लग्नाच्या सीझनसाठी मेहंदीचा अधिक उपयोग केला जाईल. सर्वांच्या हातावरील मेहंदी रंगतेच असं नाही. हातावर मेहंदी काढताना डाय अथवा अन्य रासायनिक स्वरूपातील मेहंदीचा वापर करण्यापेक्षा मेहंदीचा रंग अधिक गडद करण्यासाठी तुम्ही सोप्या घरगुती पद्धतीचा वापर करू शकता.**

- मेहंदी तेल : हातावर मेहंदी लावण्यापूर्वी तुम्ही मेहंदी तेल लावा. यामुळे मेहंदीचा रंग अधिक गडद होण्यास मदत मिळते. अनेक मेहंदी काढणारे आर्टिस्ट याचा वापर करतात. हे तेल लावण्यापूर्वी एकदा पॅच टेस्ट करून पाहा.
- लवंग ठरेल उपयोगी : जेव्हा तुमची मेहंदी सुकेल तेव्हा एका लहानशा पॅनमध्ये ७-८ लवंगा घ्या आणि गरम करा. यातून धूर निघायला लागल्यावर हाताचे तळवे थोड्या अंतरावर ठेवून ती वाफ हातावर घ्या. गडद रंग येण्यासाठी साधारण ३-४ वेळा असं करा. तुम्ही धुरी घ्यायला जमत नसेल तर तुम्ही लवंगेचे तेलही वापरू शकता. लवंग तेल कोमट करून तुम्ही हाताला लावा.
- मोहरीचे तेल : अनेक घरांमध्ये मोहरीच्या तेलाचा खाण्याच्या पदार्थांसाठी वापर करण्यात येतो. तुमची मेहंदी काढल्यानंतर मोहरीचे तेल हातावर चोळा आणि थोडा वेळ तसंच राहू द्या. मोहरीचे तेल हे उष्ण असल्यामुळे मेहंदीचा रंग गडद होण्यास मदत मिळते.
- लिंबू आणि साखरेचे पाणी : एका बाऊलमध्ये तुम्ही साखर आणि त्यात लिंबाचा रस पिळून मिक्स करून घ्या. पाण्याचा वापर अजिबात करू नका. मेहंदी सुकल्यावर एका कापसाच्या बोळ्याने हे मिश्रण मेहंदीवर अगदी हलक्या हाताने लावा. सुकलेली मेहंदी निघणार नाही याची खात्री करा. यामुळे मेहंदी अधिक काळ टिकून गडद रंग येतो.
- चहा अथवा कॉफी पावडर : मेहंदी तयार करण्यासाठी तुम्ही साध्या पाण्याऐवजी चहा अथवा कॉफीचा वापर करावा. चहा आणि कॉफीने नैसर्गिक पद्धतीने मेहंदीचा अधिक गडद रंग येतो. हा रंग अधिक काळ टिकण्यास मदत मिळते.
- लोणच्याचे तेल : आंब्याच्या लोणच्याच्या तेलामुळेही मेहंदीचा रंग अधिक गडद होण्यास मदत मिळते. यामध्ये असणाऱ्या मसाल्यांचा अर्क मेहंदी सुकल्यानंतर तुम्ही लावावा. मेहंदी काढून टाकल्यावर थोडेसे लोणच्याचे तेल हातावर घ्यावे आणि हात घासावेत. किमान १-२ तास तरी पाण्यात हात धुऊ नयेत. यामुळे मेहंदी अधिक गडद होऊन टिकते.

## शॉर्ट न्यूज

### रस्ता वादातून शेतकऱ्याला मारहाण

**नगर :** वाकोडी (ता. नगर) येथे जा- ये करण्याच्या रस्त्याच्या कारणावरून वाद होऊन एका शेतकऱ्याला लोखंडी फायटरने मारहाण करून जखमी करण्यात आल्याची घटना घडली आहे. संतोष जगन्नाथ भोढवे असे जखमी शेतकऱ्याचे नाव असून त्यांच्यावर रूग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांनी दिलेल्या जबाबावरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात पाच जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकाश गोरख मोढवे, गौरव दीपक मोढवे, स्वाती प्रकाश मोढवे, मंदाकिनी गोरख मोढवे आणि आशा दीपक मोढवे (सर्व रा. मोढवे मळा, वाकोडी) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत.

### मढी प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी लक्ष घालावे

**पाथर्डी :** मढी येथे ग्रामसभेत घेतलेला वादग्रस्त ठराव बीडओंनी केल्यानंतर रद्द हा विषय संपला होता. मात्र, शनिवारी मंत्री नितेश राणे यांनी मढी येथे येऊन अयोग्य भाषा वापरली. येथे प्रक्षोभक भाषणे झाली. येणाऱ्या काळात येथे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर याला जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित करत या प्रकरणात आता मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनीच लक्ष घालून समन्वय साधावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अॅड. प्रताप ढाकणे यांनी केली.

### पोलीसाच हे खपवून घेणार नाही : आ.काळे

**कोपरगाव :** आधार मिळेल आणि होणारा अन्याय दूर होईल, न्याय मिळेल या आशेपोटी नागरीक पोलीस प्रशासनाकडे अडचणी व तक्रारी घेवून येत असतात. या तक्रारी व अडचणी सोडवून नागरीकांना आधार देण्याचे काम हे पोलीस प्रशासनाचे आहे. जर पोलीस सर्वसामान्य नागरिकांना आधार देत नसेल व ठराविक नागरिकांच्याच तक्रारी घेत असेल तर हे अत्यंत चुकीचे आहे. या नागरीकांना आधार देण्याचे सोडून याउलट अडचणी घेवून घेणाऱ्या नागरिकांच्या अडचणी न सोडविता पोलीस प्रशासन जर नागरीकांना वेठीस धरीत असेल तर खपवून घेणार नाही, असा सज्जड इशारा आमदार आशुतोष काळे यांनी पोलीस प्रशासनास दिली.

### मोरया चिंचोरे येथून मुरमाची वाहतूक

**नेवासा :** तालुक्यातील मोरया चिंचोरे येथून डंपर व ट्रॅक्टरद्वारे मोठ्या प्रमाणात मुरमाची वाहतूक सुरू असून महसूल प्रशासन मात्र हाताची घडी अन् तोंडावर बोट ठेवून आहे. रात्रंदिवस येथून ट्रॅक्टर व डंपरद्वारे हजारो ब्रास गौण खनिजांची वाहतूक सुरू आहे. महसूल प्रशासन नेमके करते तरी काय असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. या वाहतुकीमुळे सोनई मोरे चिंचोरे रस्त्याची पूर्णपणे वाट लागली आहे. महसूल प्रशासनाच्या व पोलीस प्रशासनाच्या आशीर्वादाने या गौण खनिजांची वाहतूक सुरू असल्याचे उघडपणे बोलले जात आहे. यावर कारवाई होणे आवश्यक आहे.

### कारागृहात व्हीआयपी ट्रिटमेंट

**श्रीगोंदा :** जमिनीच्या वादातून दाखल झालेल्या गुन्ह्यात मदत करण्यासाठी ७ हजार रुपये लाच स्वीकारताना लाचलुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी रंगेहात पकडलेल्या श्रीगोंदे पोलिस ठाण्यातील संतोष फलके या पोलीस आरोपीची श्रीगोंदे येथील दुय्यम कारागृहात बंदोबस्तावरील पोलिसांकडून खास बडदास्त ठेवत व्हीआयपी ट्रिटमेंट मिळत असल्याची चर्चा श्रीगोंदे परिसरात आहे. आरोपी असलेल्या संतोष फलके या पोलीस कर्मचाऱ्याला व्हीआयपी ट्रिटमेंट देणाऱ्या अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांची चौकशी होणार का? असा सवाल विचारला जात आहे.

# शिक्षण व कौशल्य काळाची गरज

## ईश्वर निमसे यांचे प्रतिपादन



**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रम अन त्यातून नोकरी साकारणे यापलीकडेही विचार करणे गरजेचे आहे. सध्या देशाची रोजगाराची परिस्थिती पाहता व्यवसायाभिमुख शिक्षण कौशल्याच्या जीवावर उपजीविका चालता येणे सहज शक्य आहे. त्यासाठी शिक्षणाबरोबर विविध कौशल्य अंगीकारणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन युवा कौशल्य कृषी विकास बहुउद्देशीय संस्था अहिल्यानगर चे संस्थापक ईश्वर निमसे यांनी केले.**

सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे व विद्यार्थी विकास मंडळ, रमेश फिरोदीया कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साकुर यांच्या माध्यमातून 'शिक्षण व कौशल्य काळाची गरज' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ईश्वर निमसे यांनी प्रमुख वक्ता म्हणून उपस्थित विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच कौशल्य स्वयंरोजगाराच्या संधी कौशल्य घेऊन कसे साधता येईल या संदर्भात मार्गदर्शन केले. कार्यशाळेत महाविद्यालयातील जवळपास ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि भविष्य आणि शिक्षणाबरोबर कौशल्य घेण्याची शपथ घेतली. छोटासा स्वयंरोजगार साधून शिक्षणाचा खर्च भागविण्याचे अभिवचन घेतले.

कार्यशाळा संपन्न होण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉक्टर हेमलता राठोड विशेष प्रयत्न केले. या कार्यशाळेचे अध्यक्ष म्हणून प्राध्यापक रणजीत गिरी सर होते. तसेच कार्यक्रमाची प्रस्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी अध्यापक गणेश साळुंखे सर यांनी केले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्राध्यापिका वृषाली डोके यांनी केले. यावेळी प्राध्यापक मतू खेमनार विभागीय समन्वयक अहिल्यानगर यांनी विद्यार्थ्यांना विविध कौशल्य शिकण्यासाठी महाविद्यालयात नियोजन करण्यात आल्याचे सांगण्यात आले. कार्यक्रमाचे आभार प्राध्यापक पोपट खेमनार यांनी केले. यावेळी युवा उद्योजक अवधूत घोरपडे दत्ता कृपा उद्योग समूह अहिल्यानगर हे उपस्थित होते.

# सोनई पोलिसांची घोडेगाव -चांदा रस्त्यावर कारवाई

## गावठी कट्टा व जिवंत काडतुसासह आरोपीस अटक

**सोनई : प्रतिनिधी**

**सोनई पोलिसांना गावठी कट्टा बाळगणाऱ्या आरोपीला कारसह अटक केले. रविवारी पहाटे सुमारास शिवतेज शिवाजी जावळे, वय ३०, रा चांदा, ता. नेवासे याला पांढऱ्या रंगाच्या कार एमएच २० सीएच १५४५ मध्ये गावठी कट्टा जवळ घेऊन घोडेगाव ,चांदा रस्त्यावर जेरबंद केले.**

सोनईचे सपोनि विजय माळी यांनी पोलिसांचे पथक तयार करून आरोपीच्या शोधार्थ पाठवले. त्यानुसार रविवारी २ वाजता घोडेगाव शिवारातील चांदा रस्त्यावरील धनगर वस्ती रस्त्याच्या कडेला एक कार उभी असल्याची दिसली. पोलिस येण्याची चाहुल लागताच सराईत आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न करू लागला. तेव्हा त्यास पाठलाग करून शिताफीने अटक केली. त्याच्या कारची झडती घेतली असता एक गावठी कट्टा, सात जिवंत काडतुसे असा एकूण गाडीसह ५ लाख पन्नास हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.



पोलिस कॉन्स्टेबल ज्ञानेश्वर गोरक्षनाथ आघाव यांनी दिलेल्या तक्रारीवरून सराईत आरोपी शिवतेज शिवाजी जावळे याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. सोनई, घोडेगाव, पांढरीचा पुल, चांदा परिसरात गावठी कट्ट्याची मोठी संख्या आहे. त्यावर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकामधून होत आहे. ही कारवाई पोलिस अधीक्षक राकेश ओला, अप्पर पोलिस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील पाटील, सोनईचे सपोनि विजय माळी, प्रभारी अधिकारी सूरज मेढे यांच्या मार्गदर्शनाखाली के. बी. राख, डी. एम. गावडे, ज्ञानेश्वर आघाव यांच्या पथकाने केली.

# जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ्य मोहिमेस प्रारंभ

## आरोग्य समस्यांवर उपचार होणार

**नगर : प्रतिनिधी**

**उत्तम शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य हीच बालकांच्या आरोग्याची गुरुकिल्ली आहे. त्यामुळे पालकांनी आणि शिक्षकांनी राष्ट्रीय बाल स्वास्थ्य मोहिमेबद्दल जागरूक राहून बालकांच्या आरोग्याची तपासणी करून घेत त्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्याचे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.नागोराव चव्हाण यांनी केले. शहरातील कार्मेल कॉन्व्हेंट हायस्कूल मध्ये राष्ट्रीय बालस्वास्थ्य मोहिमेचा जिल्हास्तरीय प्रारंभ झाला. यावेळी ते बोलत होते.**



यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भास्कर पाटील, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. शिवशंकर वलांडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विनोद काकडे, मनपाचे आरोग्य अधिकारी सतिष राजूरकर, विजय दळवी, शाळेच्या मुख्याध्यापिका लिटील रोझ आदी उपस्थित होते. ० ते १८ वयोगटाच्या बालकांमधील शारीरिक, मानसिक, आणि विकासात्मक आरोग्य समस्या ओळखून त्यांच्यावर वेळेवर उपचार करण्यात येणार असल्याचे डॉ. चव्हाण यांनी म्हटले आहे.

# अपहरण करून युवकाचा खून

## चार आरोपी जेरबंद | गुन्ह्याची कबुली

**नगर : प्रतिनिधी**

**अहिल्यानगर शहरामधील सावेडी उपनगरातीलतपोवन रस्ता परिसरात एका युवकाचे अपहण झाले होते. या युवकाचा मृतदेह केकतायी परिसरात काल (ता. २) पोलिसांना आढळून आला होता. या प्रकरणात तोफखाना पोलिसांनी चार आरोपींना ताब्यात घेतले आहे.अनिकेत विजय सोमवंशी (वय २३), सुमीत बाळासाहेब थोरात (वय २४), महेश मारुतीराव पाटील (वय २६) व नितीन अशोक ननवरे (वय २५, सर्व रा. नवनागापूर, ता. अहिल्यानगर) अशी जेरबंद आरोपींची नावे आहेत.**




तपोवन रस्ता परिसरातील एका सलून दुकानाजवळून वैभव शिवाजी नायकवडे (वय १९, रा. ढवणवस्ती, तपोवन रस्ता, अहिल्यानगर) या युवकाचे अपहण झाले होते. या संदर्भात शुक्रवारी (ता. २८) नायकवडे कुटुंबाने तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. पोलिसांनी या प्रकरणात चार आरोपींना एमआयडीसी परिसरातून ताब्यात घेतले होते. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. वैभवचा खून करून त्याचा मृतदेह केकतायी परिसरात जाळल्याचे आरोपींनी सांगितले होते. त्यानुसार पोलिसांनी तेथे जाऊन पाहिले असता अर्धवट जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळून आला. या प्रकरणी आरोपींविरोधात पोलिसांनी अपहरण व खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

# बारीक चणीचा चिन्नू

रफ़्ता रफ़्ता वो मिरी हस्ती का सामाँ हो गए।
पहले जानाँ फिर जाने जाँ फिर जाने जानाँ हो गए।।

तस्लीम फ़ाज़ली म्हणतात, हळुहळू तो माझ्या अस्तित्वाचा भाग होत गेला. पहिल्यांदा माझा प्राण, नंतर माझ्या प्राणाचा प्राण तदनंतर माझ्या पंचप्राणांचे प्राण होत गेला. तशा काही व्यक्ती आपल्या जीवनात येतात आणि आपल्या अस्तित्वाचा एक भाग होऊन बसतात.



१९९२ साल असावे. मी त्यावेळी बँक ऑफ इंडियाच्या मुंबईतील नरिमन पॉइंट भागातील फ्री प्रेस बिल्डिंगमधील क्षेत्रीय कार्यालयात तैनात होतो. तिथे माझा एक दक्षिण भारतीय सहकर्मचारी होता. वय वर्षे पस्तीसदरम्यान असावे. चिन्नू नाव होते त्याचे. मात्र हे त्याचे खरे नसून टोपण नाव होते. चणीने बारीकच होता. उंचीने खुजा. वर्ण साधारणतः गोरा. ओठांवर मध्यम आकाराच्या बाकदार मिशा. भाविक असल्याने कपाळाला गंध लावलेले असायचे. इन्शर्ट केलेली पँट. कमरेला चामड्याचा नावापुरता पट्टा. पायात फताडे बूट. पोक काढून चालायचा. असे ते गबाळे ध्यान होते. तपकीर ओढण्याचे व्यसन होते. त्यामुळे शर्टपँटला तपकिरीचे हात पुसलेले तांबडसर डाग स्पष्टपणे लक्षात येत. त्याचा वेगळाच उग्र दर्प येई. फार किळस वाटे. अगदी त्याच्या मिशांनाही मेहंदी रंग चढल्या सारखा वाटे. एकलकोंड्या स्वभावाचा होता. कधी आणि कुठे तपकीर ओढीत असे, ते कळत नसे. बँकेच्या कॅन्टीनमध्ये जेवताना तो कधी दिसला नाही. जेवणाच्या सुट्टीत कुठे गायब होई ते समजत नसे. अविवाहित होता. जेवणाचा डबा आणीत नसे. तोंडात अपशब्द नसत. हुशारही होता. इंग्रजीत उत्तम बोलायचा. त्याला बँकिंगचे उत्कृष्ट ज्ञान होते. हुशार माणसांना देवाने काही तरी विकृती का बरे दिली असावी, ते कळत नाही!

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# वारसदार म्हणून यांचा जन्म गुजरातला झाला !

## ठाणेकरांना निष्ठा सांगण्याची गरज नाही | संजय राऊत यांचा हल्लाबोल

**ठाणे : प्रतिनिधी**

**शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने रविवारी ठाण्यात शिवसैनिकांशी सुसंवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. यासाठी शिवसेना ठाकरे गटाचे नेते ठाण्यात दाखल झाले होते. यावेळी खासदार संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे.**

यावेळी बोलताना संजय राऊत म्हणाले, प्रत्येकजण सांगतोय मला राऊत सांहेबांचे भाषण ऐकायचे आहे, पण मी म्हणतोय मला आज बोलायचे नाही, कोणी बोलूच नका. आज शिवसैनिकांना बोलू द्या, पण आज आम्ही जी मोहीम सुरू केली आहे. त्या मोहिमेचा पहिला दिवस किंवा पहिली स्वारी ही ठाण्यावर आहे. मी ठाण्यामध्ये प्रवेश केला नेहमीप्रमाणे आमच्या राजन विचारे साहेबांनी आनंद नगर नाक्यावर स्वागत केले. तेव्हा मी म्हणालो परत एकदा आपले जुने वैभवाचे दिवस सुरू झाले आहेत.



पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, टेंभी नाक्यावर आलो, धर्मवीर आनंद दिघे यांना अभिवादन करण्यासाठी पोहोचलो, तेव्हा पाच पंचवीस महिला समोर आल्या, गद्दारांना महिलांना पुढे करायची सवयच आहे. आम्ही बाळासाहेबांच्या विचारांचे खरे वाहक आणि वारसदार आहोत. हे फक्त होर्डिंग लावतात, यांचा वारसदार म्हणून जन्म गुजरातला झाला आहे. जेव्हा शंभर रेडे कापले तेव्हा एक जन्माला आला. त्यामुळे ठाणेकरांना निष्ठा सांगण्याची गरज नाही, ठाणेकरांनी निष्ठा काय असते हे वारंवार महाराष्ट्राला दाखवून दिले आहे.

दरम्यान, संजय राऊत जेव्हा ठाण्यात पोहोचले तेव्हा शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी जोरदार निदर्शने केली. दोन्ही शिवसेनेचे नेते व कार्यकर्ते आमने सामने आले होते. जोरदार घोषणाबाजी यावेळी करण्यात आली. तसेच संजय राऊत यांनी आनंद आश्रमात जण्यापासून देखील रोखले. यावर संजय राऊत म्हणाले, आनंद आश्रमात जाण्यापासून आम्हाला कोणीही रोखू शकत नाही. पण आनंद आश्रम कोणत्या तरी खासगी व्यक्तीने आपल्या नावावर करून घेतला आहे. तो आता दिघे साहेबांचा आश्रम राहिला नाही, असे संजय राऊत म्हणाले.

(पान १ वरून)

### लाडकी बहीण योजनेचा फेब्रुवारीचा हप्ता मार्चमध्ये !

अदिती तटकरे म्हणाल्या की, लाडकी बहीण योजना ही विरोधकांच्या डोळ्यात खूपत असल्याने त्यांनी ह्या योजनेला विरोध केला आहे. आता महिलांचा महायुतीला मिळणारा प्रतिसाद पाहता त्यांना नैराश्य आले आहे. म्हणून ते खोट्या गोष्टी पसरवण्याचा प्रयत्न करत आहेत. पण महायुतीचे सरकार सक्षम आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सरकार ही योजना अशीच सुरू ठेवणार आहे.

अधिवेशनानंतर मार्चचा हप्ता

अदिती तटकरे म्हणाल्या की, फेब्रुवारी महिन्याचा जो हप्ता आहे तो आपण महिला दिनाच्या पूर्वसंध्येला महिल्याच्या खात्यात जमा करणार आहोत. तर मार्च महिन्याचा हप्ता अधिवेशन झाल्यावर विभागाच्या वतीने निधीचे नियोजन करण्यात येईल तेव्हा देण्यात येईल.

महिलांनी आर्थिक सक्षम व्हावे

अदिती तटकरे म्हणाल्या की, लाडकी बहीण योजनेचा हप्ता २१०० रुपये करण्याचा योग्य निर्णय हा मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री घेतील. आम्ही योजनेचा निधी लाडक्या बहीणींच्या खात्यात कसा जाईल यासाठी प्रयत्न करणार आहोत. बचत गटाच्या माध्यमातून महिलांनी आर्थिक सक्षम व्हावे यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत.

### राज्यात वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज

उपनगरामध्ये दुपारच्या वेळी उष्मा वाढला आहे. याठिकाणी हवामान खात्याने तापमान वाढीचा इशारा दिला आहे. उष्णतेच्या झळांमुळे नागरिकांना घराबाहेर पडण्यापूर्वी उष्माघातापासून बचावासाठीचे प्रतिबंधात्मक उपाय वापरात आणण्याचा सल्ला दिला जात आहे. हवामान खात्याने अलीकडेच घेतलेल्या पत्रकार परिषदेत यंदाच्या मार्च महिन्यामध्ये उष्णतेच्या लाटा मोठ्या प्रमाणावर येणार असून उन्हाळा अधिक तापदायक ठरणार असल्याचे सांगितले. फक्त महाराष्ट्रच नाही, तर देशाच्या दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत आणि पश्चिमेपासून पूर्वेपपर्यंत प्रत्येक राज्यात हवामानाची वेगळी स्थिती दिसून येत आह. भारतीय हवामान खात्याच्या माहितीनुसार आज, रविवारपासून एक पश्चिमी झंझावात सक्रिय होत आहे. त्यामुळे पर्वतीय भागांमध्ये तूफान हिमवृष्टीचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. सोमवारी जम्मू काश्मीर आणि हिमाचल प्रदेशात बर्फवृष्टीसह बर्फवृष्टीचीसुद्धा शक्यता वर्तविण्यात आली आहे. सोमवारी तीन मार्चला हिमाचल प्रदेशात काही ठिकाणी हिमवृष्टीची शक्यता असून, उत्तराखंडच्या काही भागात जोरदार पाऊस आणि हलक्या बर्फवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.

# भारतीय ज्ञान परंपरा विद्या शाखांची जननी

## डॉ. श्रध्दा कुंभोजकर यांचे प्रतिपादन | अळकुटी महाविद्यालयात राष्ट्रीय परिषद



**अळकुटी : प्रतिनिधी**

**भारतीय ज्ञान परंपरा ही सर्वच विद्याशाखांची जननी आहे. कला, वाणिल्य, विज्ञान वैद्यकशास्त्र, अभियांत्रिकी, योग आदी सर्व ज्ञान शाखा या भारतीय ज्ञान परंपरेने व्यापलेल्या असल्याचे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाच्या अध्यक्षा डॉ. श्रध्दा कुंभोजकर यांनी केले.**

अळकुटी महाविद्यालयात भारतीय ज्ञान व्यवस्थेबाबत बहुविद्याशाखीय दृष्टीकोन या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी डॉ. कुंभोजकर यांनी मार्गदर्शन केले. सिनेट सदस्य डॉ. प्रदीप दिघे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी बोलताना कुंभोजकर म्हणाल्या, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार भारतीय ज्ञान परंपरेला विशेष प्राधान्यक्रम देण्यात आला आहे. म्हणून प्रत्येकाने या विषयाचे अवलोकन करून घेणे गरजेचे आहे. अगदीच दैनंदिन व्यवहारातही आपण भारतीय ज्ञान परंपरेलीत काही परंपरांचा अवलंब करत असतो.

### ९१ शोधनिबंध

या परिषदेसाठी देशभरातील तब्बल ९१ संशोधकांनी शोधनिबंध पाठविले होते. हे शोध निबंध प्रकाशित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय जर्नलच्या दोन व्हॉल्युमचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. सदर जर्नल प्रमाणपत्र उपस्थित संशोधकांना वितरित करण्यात आले.

परिषदेच्या दुसऱ्या सत्रात डॉ. महेश खर्डे यांनी विद्यापीठ अनुदान आयोग व केंद्र सरकारने भारतीय ज्ञान प्रणाली बाबत जे धोरण जाहिर केले आहे त्याबाबत माहीती दिली. प्राचार्या डॉ. कुंदा कवडे यांनी भारतीय ज्ञान परंपरेची साहित्य क्षेत्रातील भुमिका विषद केली. तृतीय सत्रात डॉ. भाऊसाहेब रणपिसे यांनी भारतीय ज्ञान प्रणालीत अर्थशास्त्र, वाणिज्य व व्यापार यांची असणारी भुमिका स्पष्टपणे अधोरेखित केली. डॉ. शांताराम चौधरी यांनी भारतीय ज्ञान परंपरेच्या वाटचालीचा आढावा घेतला. चतुर्थ सत्रात डॉ. आनंद कुलकर्णी यांनी भारतीय ज्ञान प्रणाली आपण दैनिंदिनपणे जगतो असे सांगितले.

### भारतीय ज्ञान परंपरा प्रवाही

लोणचे बनविण्याची प्रक्रिया व त्याचे ज्ञान हे पिढ्यानपिढ्या वारसा पध्दतीने आलेले आहे. परंतू त्याचा उगम कोठे झाला ? त्याचे श्रेय कोणाला द्यावे ? हे आज आपण निश्चितपणे सांगू शकत नाही. असे असले तरी लोणचे बनविण्याची प्रक्रिया व त्या संदर्भातील असणारे ज्ञान हा सुक्ष्म घटक आपल्याला नाकारता येत नाही. असे दैनंदिन जीवनातील प्रसंग हे भारतीय ज्ञान परंपरेशी जोडलेले असतात. म्हणूनच भारतीय ज्ञान परंपरा ही प्रवाही आहे.

**डॉ. श्रध्दा कुंभोजकर**
इतिहास अभ्यास मंडळाच्या अध्यक्षा

### वैभवशाली वारसा

जागतिक पातळीवर भारतीय ज्ञान परंपरेला वैभवशाली वारसा लाभलेला आहे. प्राचीन कालखंडातील वैद्यकशास्त्र हे आयुर्वेदावर अवलंबून होते. आयुर्वेदात सांगितलेल्या गुळवेल, हळद, कडूनिंब आदी औषधी वनस्पती आजही रासायनिक औषधांपेक्षा अधिक पटीने उपकारक ठरतात. म्हणूनच भारतीय ज्ञान प्रणाली आणि आजची वैज्ञानिक पध्दती यांची सांगड घालून मानवी जीवन उपकारक बनविणे गरजेचे आहे.

**डॉ. प्रदीप दिघे,** सिनेट सदस्य

यावेळी सीताराम खिलारी यांनीही उपस्थितांशी संवाद साधला. प्रा. लक्ष्मण कोठावळे, शरद शिंगोटे, डॉ. हरेश शेळके, प्रा. दत्तात्रय शेळके यांनी शोधनिबंधाचे वाचन केले. यावेळी दिनेश बाबर, भाऊसाहेब डेरे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# अंधारवाटमुळे कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलता वाढते

## आयुक्त प्रवीण पुरी यांचे प्रतिपादन | अंधारवाट काव्य संग्रहाचे प्रकाशन

**पारनेर : प्रतिनिधी**

**अंधारवाट हा काव्यसंग्रह आवर्जुन वाचला पाहिजे. अशा कविता वाचल्याने कल्पनाशक्ती आणि सर्जनशिलता वाढते. भावना व्यक्त करण्याची क्षमता वाढते असे प्रतिपादन राज्याचे दिव्यांग आयुक्त प्रवीण पुरी यांनी केले.**

पारनेर तालुक्यातील वडनेर बुद्रुक येथील रंगनाथ गजरे यांच्या अंधारवाट या काव्यसंग्रहाचे प्रकाशन आयुक्त पुरी यांच्या हस्ते पुणे येथे करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

पुरी म्हणाले, अंधारवाट ही अंधारातून चालण्यासाठी असते हे नक्की.परंतू अंधारवाट हे पुस्तक वाचल्यानंतर प्रकाशाकडे जाण्याची वाट सापडल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी कविता वाचल्याच पाहिजेत. अंधार वाटेवरून चालताना ज्यांना प्रकाशाचा तिमिर सुध्दा दिसत नाही त्यांनी आवर्जुन हा कविता संग्रह वाचला पाहिजे. अंधारवाट हा कविता संग्रह म्हणजे प्रकाशाकडे जाण्याचा महामार्ग असल्याचे पुरी म्हणाले.



कवी रंगनाथ गजरे यांच्या अंधारवाट या कविता संग्रहाचे दिव्यांग आयुक्त प्रवीण पुरी यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

### प्रेरणा देणारा कविता संग्रह

कवितेमुळे सभोवतालचे सौंदर्य पाहता येते आणि आपल्याला सौंदर्यदृष्टी प्राप्त होते. दिव्यांग बांधवांना खरंतर सर्वांनाच प्रेरणा देणारा अंधारवाट हा कवितासंग्रह आहे.

**प्रवीण पुरी,** दिव्यांग आयुक्त

### कवी गजरे गीतकाराच्या भूमिकेत


कवी रंगनाथ गजरे हे पारनेर तालुक्यातील वडनेर बुद्रुक येथील असून आजवर त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. मुक्ताई, कशी फसली नानाची टांग, ठाकराचा तुक्या, तांबडं फुटलं, टिपोऱ्या, ठकसेन, पिटर, धुंद मधुमती या चित्रपटासाठी कवी गजरे यांनी गीते लिहिली आहेत. शॉर्ट फिल्म तसेच अल्बमसाठीही त्यांनी गीते लिहिलेली आहेत.

# मंगळवारी पारनेरात छावा चित्रपट

## नगरसेवक अशोक चेडे यांची माहिती

**पारनेर : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित छावा चित्रपट मंगळवार दि.४ मार्च रोजी पारनेर शहरातील भैरवनाथ मंदिरामागील तुळजाभवानी मैदानावर सायंकाळी साडेसात वाजता दाखविण्यात येणार असल्याची माहिती नगरसेवक अशोक चेडे यांनी दिली.**




संभाजी महाराजांचा इतिहास घराघरात पोहचविण्यासाठी आ. काशिनाथ दाते मित्र मंडळ, तुळजाभवानी नवरात्र उत्सव समिती, शिवप्रतिष्ठान हिंदुस्तान, नगरसेवक अशोक चेडे, विद्या गंधाडे, विद्या कावरे व अॅड. मंगेश औटी यांनी पुढाकार घेतला आहे.


हा चित्रपट पाहण्यासाठी जास्तीत जास्त पारनेरकरांनी हजेरी लावण्याचे आवाहन नगरसेवक अशोक चेडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे.

# बाबुर्डीत छावा चित्रपटास उत्स्फूर्त प्रतिसाद

## मोरया मेडिकल ग्रुपचा पुढाकार

**सुपा : प्रतिनिधी**

**सर्वत्र चर्चा असलेला छावा चित्रपट गावामध्येच पाहण्याची संधी ग्रामपंचायत सदस्य प्रवीण दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली मोरया मेडिकल ग्रुपच्या वतीने बाबुर्डीकरांना मिळाली. या चित्रपटासाठी बाबुर्डीकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.**




छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर अधारित छावा हा चित्रपट प्रदर्शित झाल्यापासून देशभर त्यास मोठा प्रतिसाद मिळत आहे. गावाकडील पुरूष, महिलांना हा चित्रपट पाहता याचा या भावनेतून प्रवीण दिवटे यांनी रविवारी या चित्रपटाचे आयोजन केले होते.

हा चित्रपट सर्वांसाठी विनामुल्य होता. लवकरच रांजणगांव मशिद, कडूस, वाळवणे, पाडळी रांजणगांव येथेही हा चित्रपट दाखविण्यात येणार आहे.

विकी कौशल्य याने छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारली असून रष्मिका मंदन्ना यांनी महाराणी येसूबाईची भुमिका साकारली आहे. हा चित्रपट ग्रामस्थांना पाहण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते विकास गाडगे व मोरया मेडिकल ग्रुपचे ग्रामस्थांनी आभार मानले.

# श्री मुलिकादेवी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन; वैज्ञानिक रांगोळी स्पर्धेचेही आयोजन

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील श्री मुलिकादेवी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात झालेल्या प्रगतीबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करणे, वैज्ञानिक दृष्टीकोन वाढीस लागावा या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**

सोनई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर लावरे हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. त्यांनी विज्ञानाचे महत्व अधोरेखीत करताना वैज्ञानिक दृष्टीकोनच समाजाच्या विकासाचा पाया असल्याचे सांगितले. विज्ञानाचा उपयोग मानव कल्याणासाठी व्हावा तसेच विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टीकोन ठेउन नवीन संशोधनात पुढे यावेत असा संदेश त्यांनी दिला.



विज्ञान दिनानिमित्त निघोज महाविद्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांनी विज्ञान दिनाच्या महत्वावर प्रकाश टाकत विज्ञानाच्या मदतीने समाजातील अंधश्रध्दा व अवैज्ञानिक विचारांना दुर करण्याचे आवाहन केले. शेतकरी एक उत्तम संशोधक आहे. शेतीवरील प्रयोगशीलतेमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढल्याचे ते म्हणाले.

प्रा. निलिमा घुले यांनी प्रास्ताविक,डॉ. प्रवीण जाधव यांनी सुत्रसंचलन तर प्रा. नम्रता थोरात यांनी आभार मानले.यावेळी मनोहर एरंडे, आनंद पाटेकर, डॉ. मनिष गाडीलकर, डॉ. पोपट पठारे, संगीता मांडगे, स्वाती मोरे, दुर्गा रायकर, अशोक कवडे, सचिन निघुट, अक्षय अडसूळ, अपेक्षा लामखडे, अमृता दौंडकर, वृषाली जगदाळे, निकिता सुरोशे, रूपाली गोरडे, पुनम गंधाक्ते, स्वाती पवार, हर्षदा पंडीत, सुनंदा गाडीलकर, सुप्रिया सालके, डॉ. गोरक्ष घोलप, दीपक खामकर, सुरेश गाडीलकर, प्रवीण सरडे, डॉ. ईश्वर म्हस्के या प्राध्यापकांसह नवनाथ घोगरे, संदीप लंके, अक्षय घेमुड आदी उपस्थित होते.

### रांगोळी स्पर्धा

विज्ञान दिनानिमित्त वैज्ञानिक रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विज्ञानाशी संबंधित विविध संकल्पना रांगोळीच्या माध्यमातून सादर करत विज्ञान विषयक संदेश दिले. स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# पारनेर महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव ; संविधानास ७५ वर्षे पुर्ण झाल्याचे औचित्य

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर येथील न्यू आर्टस,कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेजमध्ये भारतीय संविधानास ७५ वर्षे पुर्ण झाल्याचे औचित्य साधून महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाच्या वतीने संविधान गौरव महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.**

संविधान गौरव महोत्सवाचे राज्यभर आयोजन करण्यात येत असून त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. यावेळी उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापकांना संविधानाची शपथ देण्यात आली.



पारनेर महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सव कार्यक्रमात उपस्थितांना संविधानाची शपथ देण्यात आली.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. नितीन निपुंगे यांनी राज्यघटनेच्या प्रास्ताविकेचे वाचन केले. या कार्यक्रमाप्रसंगी राज्यशास्त्र विभागाचे प्रा. शामराव रोकडे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ. रवींद्र देशमुख, अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे समन्वयक डॉ. दत्तात्रय घुंगार्डे हे उपस्थित होते.

# छावा पाहण्यासाठी वडनेरकर चित्रपटगृहात !

## नीलेश लंके प्रतिष्ठानचा पुढाकार



**वडनेर हवेली : प्रतिनिधी**

**गावात नव्हे तर थेट शिरूरच्या चित्रपट गृहात नेऊन वडनेर हवेली येथील महिला तसेच अबाल वृध्दांना छावा चित्रपट दाखविण्यात आला. सतीश भालेकर यांच्या नेतृत्वाखाली नीलेश लंके प्रतिष्ठानच्या सदस्यांनी त्यासाठी पुढाकार घेतला.**

छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास प्रत्येकापर्यंत पोहचला पाहिजे या प्रांजळ भावनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे भालेकर म्हणाले. त्यांनी सांगितले की गावोगावी छावा चित्रपट दाखविण्यात येत आहे. वडनेर येथेही चित्रपट दाखविण्याबाबत चर्चा झाली. मात्र शेतामध्ये काम करणारे पुरूष, स्त्री यांना चित्रपट पाहण्यासाठी चित्रपटगृहात जाण्याची फारशी संधी मिळत नाही.

मात्र छावा चित्रपटाच्या निमित्ताने हा योग जुळून आपल्याने सर्वांना गावात नव्हे तर चित्रपटगृहात नेऊन चित्रपट दाखविण्याची संकल्पना मांडण्यात आली. त्यास सर्वांनी मान्यता दिल्यानंतर विशेष बसेसमधून ग्रामस्थांना शिरूर येथे नेण्यात येउन छावा चित्रपट दाखविण्यात आला.

### हॉटेलमध्ये भोजनाचा आस्वाद !

चित्रपट संपल्यानंतर सर्व ग्रामस्थांना हॉटेलमध्ये सुरूची भोजनाची मेजवानी देण्यात आली. तालुक्यात प्रथमच चित्रपटगृहात नेऊन छावा चित्रपट दाखविण्याची पर्वणी नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आली.

# चोंभूतकरांनी अनुभवला ‘‘छावा’’चा थरार!

## परिवर्तन फाउंडेशन मार्फत मोफत चित्रपटाचे आयोजन

**चोंभूत : स्वप्नील भालेराव**

**१ मार्च शनिवारचा दिवस ॐ चैतन्य कानिफनाथ महाराज मंदिराच्या प्रांगणात ८१२ साईजची अद्यावत स्क्रीन त्या समोर लहान मुलांपासून वयोवृद्धांपर्यंत महिला पुरुषांची जमलेली अलोट गर्दी यापाठीमागे औचित्य होते स्वराज्य रक्षक संभाजी महाराज यांच्या धगधगत्या, रोमहर्षक, भावनिक इतिहास पाहण्याचे नियोजन तेही छावा या बहूचर्चित चित्रपटाच्या माध्यमातून.**

सध्या बॉलिवूड क्षेत्रात सर्वात चर्चेत असलेल्या दिग्दर्शक लक्ष्मण उत्तेकर यांचा ‘‘छावा‘‘ चित्रपटाचे मोफत प्रक्षेपण चोंभूतकरांसाठी परिवर्तन फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रम प्रसंगी चोंभूत गावातील समस्त ग्रामस्थ उपस्थित होते. स्वराज्य रक्षक संभाजी महाराजांचा खराखुरा इतिहास गावातील प्रत्येक नागरिकांच्या ह्रदयापर्यंत पोहचण्यासाठी. त्यांनी त्यांच्या जीवनात स्वराज्यासाठी केलेला त्याग. शेवटच्या श्वासापर्यंत मुघलांना दिलेली कडवी झुंज शेवटी त्यांचा झालेला करूण अंत हा सारा इतिहास याची देही याची डोळा साश्रू नयनांनी चोंभूत ग्रामस्थांनी अनुभवला.



कार्यक्रमाची सुरुवात उद्योजक सुनील शेळके यांच्या हस्ते छ. शिवाजी महाराज यांच्या प्रतिमापुजनाने व आरतीने झाली प्रमुख उपस्थिती शिरापूरचे सरपंच भास्कर उचाळे यांची होती. हा सर्व कार्यक्रम पार पाडण्यासाठी परिवर्तन फाउंडेशन चे पदाधिकारी पत्रकार पांडुरंग म्हस्के,प्रणल भालेराव(ग्राम.पंचायत सदस्य)रावजी सोमवंशी,नितीन घोलप,खंडू खांडकर,किरण जमदाडे,सुरेश दरेकर,रावसाहेब माळी,बबन कोल्हे,बाळासाहेब मेहेर,विक्रम पारखे,दीपक नरवडे,विक्रम सोमवंशी,खंडू मेहेर महेंद्र म्हस्के,विकास वाघुले आदेश शिंदे सोमनाथ आल्हाट यांचे सहकार्य लाभले.साउंड सहकार्य मोरया साउंड इव्हेन्ट अॅण्ड डेकोरेशन चाकण यांचे लाभले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक, सूत्रसंचालन भाऊ माळी सर यांनी केले.

### संभाजीराजे घराघरात पोहचविल्याचा आनंद

छ. संभाजी राजे इतिहासातील प्रेरणादायी असे व्यक्तिमत्व आहे. त्यांचा संघर्ष, स्वराज्याप्रती असणारी तळमळ ह्या साऱ्या गोष्टी छावा सिनेमात दाखवल्या आहेत.राजांच्या व्यक्तिमत्वाचा, कार्यकर्तृत्वाचा आदर्श प्रत्येकाने घ्यावा या उद्देशाने चोंभूत गावात मोफत सिनेमा प्रक्षेपणाचे आयोजन करण्यात आले होते.यामाध्यमातून छ. संभाजी राजे घराघरापर्यंत पोहचवता आले. याचा आनंद आहे.

**सुनील गंगाधर शेळके**
उद्योजक / संचालक शेळके ग्रुप

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com